REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# पंडीत जवाहरलाल नेहरू आणि तिसरे जग

प्रा. तानाजी संभाजी माने
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा, जि. चंद्रपूर.

**गोशवारा :—**

पं. नेहरूंनी भारतीय परराष्ट्र धोरणाची आखणी करताना स्वतंत्र परराष्ट्र धोरणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. तसेच आशिया व आफ्रिका खंडातील गरीब आणि विकसनशील राष्ट्रांचे भारताने नेतृत्व करावे, अशी त्यांची ईच्छा होती. यासाठी पं. नेहरूंनी भारताच्या परराष्ट्र धोरणात जागतिक शांतता, परस्पर सहकार्य, व सहअस्तीत्व प्रस्थापित करण्यासाठी तिसऱ्या जगाची बांधणी व अलिप्ततावादाला स्थान दिले.


## 1) प्रस्तावना :—

ज्यांचा उल्लेख भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचे अप्रतिम योध्दा असा केला जातो; अशा भारताचे पहिले पंतप्रधान पं. नेहरूंचा भारताच्या जडण—घडणीत सिहांचा वाटा राहिला आहे. पं. नेहरूंनी आपले विचार आणि कार्यकतृत्वाने भारतीय स्वातंत्र्य आंदोलन आणि स्वतंत्र भारताची राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थेला प्रभावित केले आहे. त्यांनी स्वतंत्र भारतात संसदीय परंपरा, समाजवादी अर्थव्यवस्था आणि स्वतंत्र व अलिप्ततावादी परराष्ट्र धोरणाबाबत सातत्याने पुढाकार घेतला होता. शशी थरूर यांच्या शब्दात, ''नेहरूंचा भारतावरील प्रभाव चार प्रमुख स्तंभावर विसावला आहे. लोकशाही संस्था निर्मिती, सच्ची धर्मनिरपेक्षता, समाजवादी अर्थकारण आणि अलिप्ततावादी परराष्ट्र धोरण होय.''[1]

पं. नेहरूंचा आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सुक्ष्म आकलन करण्याकडे सुरूवातीलपासूनच कल होता. तसेच त्यांच्याकडे परराष्ट्र धोरण निर्धारणासाठीचा आवश्यक असणारा व्यासंग, राष्ट्रीय हिताची जाणीव, दुरदृष्टी आणि अनुभव आदी गुण होते. पं. नेहरूंनी राष्ट्रीय सुरक्षेच्या सर्व समावेशक संकल्पनेबरोबरच सामुहिक सुरक्षेच्या संकल्पनेचा ही पुढाकार केला होता. म्हणजेच त्यांची अशी ईच्छा होती की, भारताने आशिया, आफ्रिका खंडातील सर्व राष्ट्रांत एकता निर्माण करण्यासाठी पुढाकार घ्यावा. त्यासाठी त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे दिसते. तिसऱ्या जगातील आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रासमोर असलेल्या समस्यांना भारताच्या परराष्ट्र धोरणात स्थान दिले. याबाबत माधव गोडबोले म्हणतात, ''नेहरू इतिहासाचे गाढे अभ्यासक असल्याने त्यांचा जगाकडे बघण्याचा दृष्टीकोण विशाल होता. ..... त्यामुळेच त्यांनी त्यावेळच्या अनेक अविकसित देशांचे प्रश्न सहृदयतेने समजून घेतले आणि वसाहतवादाविरूध्द आवाज उठविला. त्यामुळे ते आशियाई व आफ्रिका देशांत आपले एक वेगळे स्थान निर्माण करू शकले.''[2]

## 2) अध्ययनाचे उद्दिष्ट्ये :—

1) पं. नेहरूंनी तिसऱ्या जगाच्या एकतेसाठी घेतलेल्या पुढाकाराचा अभ्यास करणे.



2) पं. नेहरूंच्या अलिप्ततावादी चळवळीतील योगदानाचा अभ्यास करणे.

## 3) तिसऱ्या जगाची संकल्पना :—

इ.स. 1952 साली फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ व लोकसंख्याकार आल्फ्रेड सॉवी यांनी सर्वप्रथम तिसऱ्या जगाची संज्ञा मांडली. 'तिसरे जग' हा शब्द मुळातच 'तिसरी सत्ता' या पार्श्वभूमीवर अस्तीत्वात आला. फ्रान्समध्ये क्रांतीपूर्व काळात

तीन प्रकारच्या मान्यताप्राप्त सत्ता होत्या. त्यात अधिकार संपन्न पण अल्पसंख्याक असणाऱ्या पुरोहित व अभिजात वर्गाची पहिली व दुसरी सत्ता होती. तर याउलट दुर्बल, मागास असलेल्या बहूसंख्याकांची तिसरी सत्ता होती. या तिसऱ्या सत्तेची फ्रान्समध्ये ज्याप्रमाणे स्थिती होती. त्याप्रमाणे जागतिक पातळीवर स्थिती असणाऱ्या देशासाठी 'तिसरे जग' ही संज्ञा वापरली जाते. 'तिसरे जग या राजकीय शब्दाचा वापर साधारणपणे आशिया, आफ्रिका व लॅटीन अमेरिका येथील नवोदीत व विकसनशील देशांसाठी वापरला जातो.'[3] दु. महायुध्दानंतरच्या काळात आशिया, आफ्रिका व लॅटीन अमेरिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांनी त्यांच्यासमोरील समस्या सोडविण्यासाठी पंडीत जवाहरलाल नेहरू, कर्नल नासेर व मार्शल टिटो यांच्या नेतृत्वाखाली जी एकजूट दाखविली, त्यातूनच तिसऱ्या जगाच्या संकल्पनेचा उदय झाला.

## 4) विश्लेषणात्मक निर्वचन :–

I) स्वातंत्र आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या राष्ट्रीय कॉंग्रेस व पं. नेहरूंनी सुरूवातीपासूनच भारताच्या परराष्ट्र धोरणाला आकार देण्याचा प्रयत्न केला. पं. नेहरूंच्या मते, ''भारताच्या स्वातंत्र्य चळवळीकडे एक अलिप्त घटना म्हणून न पाहता संपूर्ण आशिया आणि आफ्रिका खंडात चालू असलेल्या वसाहतवादाविरोधी व्यापक संघर्षाचा एक भाग म्हणून पाहायला हवे. त्यामुळे स्वतंत्र भारताने वसाहतवादाविरूध्द संघर्ष करणाऱ्या इतर राष्ट्रांना मदत आणि सहकार्य करण्याची आवश्यकता आहे.''[4] जागतिक शांतता, शेजारील राष्ट्रांशी मैत्रीपूर्ण आणि सहकार्याचे संबंध, साम्राज्यवाद व वसाहतवादाला विरोध यासारखी उद्दिष्ट्ये तथा मुलभूत सिध्दांत आकारास आली. त्यातुनच आशियाई राष्ट्रांचा संघ स्थापन केला जावा, या कल्पनेने बिजारोपण झाले.

पं. नेहरूंनी इ.स. 1927 सालच्या ब्रुसेल्स संम्मेलनापासून आशिया संघ स्थापण्यासाठी पाऊले टाकण्यास सुरूवात केली. त्याचाच एक भाग म्हणजे कॉंग्रेसने आशिया खंडातील इतर शोषित, पराधीन, राष्ट्रांच्या राष्ट्रीय आंदोलनाशी संपर्क प्रस्थापित करावा, असा आग्रह कॉंग्रेसकडे पाठविलेल्या अहवालात केला होता. या त्यांच्या अहवालात तिसऱ्या जगासंबंधीचे विचार डोकावतांना दिसतात. विशेषत; दुसऱ्या महायुध्दानंतर पं. नेहरूंच्या पुढाकारातून व प्रेरणेतून आशिया, आफ्रिका व लॅटीन अमेरिकेतील स्वातंत्र्यासाठी संघर्षरत असलेल्या तथा नवस्वतंत्र राष्ट्रांसमोर असलेल्या समस्या सोडविण्यासाठी सभा, संम्मेलने, बैठका व परिषदा आयोजीत करण्यात आल्या. यात पं. नेहरूंचा प्रभाव लक्षात घेता, भारताकडे तिसऱ्या जगाचा नेता म्हणून पाहायले जायचे.

II) सामान्यत; बेलग्रेड परिषदेपासून तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या अलिप्ततावादी आंदोलनाला संघटनात्मक स्वरूप प्राप्त झाले. मात्र त्याची सुरूवात ही इ.स. 1947 च्या आशियाई परिषदेपासून झाली. पं. नेहरूंनी या परिषदेसाठी पुढाकार घेऊन तिचे नेतृत्व केले. दुसऱ्या महायुध्दानंतर जग कसे असेल? तथा कसे असावे? हा विषय पं. नेहरूंच्या चिंतनाचा केंद्रबिंदु होता. त्याची अशी भूमिका होती की, तिसऱ्या महायुध्दाला रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहयोग व विश्वबंधुत्वाचा स्विकार करणे आवश्यक आहे. यासाठीच आशियाई मैत्री परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत 28 देशांच्या प्रतिनिधीनी सहभाग घेतला होता. मात्र या परिषदेवर सर्वस्वी वर्चस्व हे पं. नेहरूंचेच होते. यासंबंधी मुस्लीम लिगच्या डॉन या मुखपत्रात अशी टिका केली होती की, ''पं. नेहरूंनी अतिशय हुशारीने स्वतःला संपूर्ण आशियाच्या नेतृत्वस्थानी बसवून घेतले.''[5] यावरून या परिषदेतील पं. नेहरूंच्या नेतृत्वाची कल्पना करता येते.

III) याचा पुढचा टप्पा म्हणजे इ.स. 1949 साठी दिल्ली येथे इंडोनेशियाच्या प्रश्नांवर विचार करण्यासाठी आयोजीत करण्यात आलेली आफ्रो–आशियाई परिषद होय. या परिषदेसाठी अनुकूल वातावरण निर्मितीचे काम इ. स. 1947 च्या आशियाई परिषदेतूनच झाले होते. विशेषतः दुसऱ्या महायुध्दानंतर तिसऱ्या जगातील नवस्वतंत्र राष्ट्रांनी शीतयुध्दाच्या राजकारणापासून स्वतःला दूर ठेवत अलिप्ततावाद, वसाहतवादाचा विरोध या आधारावर सामान्य धोरणाच्या विकासासाठी प्रयत्न करू लागले. या प्रयत्नाच्या परिणामातून 'आशियाई–आफ्रो ऐक्य' आंदोलनाचा विकास झाला. 7 सप्टेंबर 1947 च्या भाषणात पं. नेहरूं म्हणतात की, ''आपण एकमेकांविरूध्द असणाऱ्या गटाच्या सत्तासंघर्षाच्या राजकारणपासून अलग राहिले पाहिजे. कारण की नुकतीच याची परिणती जागतिक महायुध्दात झाली आहे.''[6] थोडक्यात या आफ्रो – आशियाई परिषदेत नवस्वतंत्र राष्ट्रांकडून शीतयुध्दाच्या राजकारणात स्वतःच्या स्वातंत्र्य रक्षणाबाबत विचार व्यक्त करण्यात आला.

IV) तिसऱ्या जगाच्या संघटनात्म बांधणीच्या तथा अलिप्ततावादाच्या दृष्टीने इ.स. 1955 साली एका महत्वपूर्ण परिषदेचे आयोजन करण्यात आले. ती परिषद म्हणजे बाडुंग परिषद होय. कारण या परिषदेमुळे आंतरराष्ट्रीय

पातळीवरील एका महत्वपूर्ण चळवळीच्या निर्मितीस चालना मिळाली. या परिषदेत आशिया – आफ्रिकेतील 29 देशांचा सहभाग होता. आशिया – आफ्रिका खंडातील सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक समस्या सोडविण्याच्या उद्देशाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेमुळे या दोन्ही खंडातील नवस्वतंत्र राष्ट्राच्या परस्पर सहकार्याला चालना मिळाली. यात सहभागी 29 राष्ट्र हे आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या टप्यांवर होते. या देशांतील शासनव्यवस्था व समाजव्यवस्था विभिन्न प्रकारची होती. म्हणजेच अशाप्रकारची भिन्नता असलेल्या तिसऱ्या जगातील राष्ट्रांना बाडूंग परिषदेच्या माध्यमातून एकाच व्यासपीठावर आणण्यात आले. वारनेट यांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास, ''हि परिषद म्हणजे तिसऱ्या जगाच्या पुनरूत्थानाचे प्रतिक आहे.''[7] तर पं. नेहरूंनी आशिया – आफ्रिका खंडातील राष्ट्रे नव्या युगात प्रवेश करत असल्याची खूण' अशा शब्दात या परिषदेचे महत्व विशद केले होते. थोडक्यात अलिप्ततावादी चळवळीचे उगमस्थान मानल्या जाणाऱ्या या परिषदेतील पं. नेहरूंचे स्थान हे एक महत्वपूर्ण संघटनकर्ता म्हणून राहिले आहे.

V) इ.स. 1961 साली युगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड येथील परिषदेमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात अलिप्ततावादी चळवळीचा उदय झाला. वास्तविक पाहता प. नेहरूंनी स्वातंन्त्र्यपूर्व काळापासून अलिप्ततावादाची तात्वीक व धोरणात्मक पायाभरणी करण्याचे कार्य केले होते. त्यास निश्‍चित अशा संघटनेचे स्वरूप या परिषदेने प्राप्त केले. इ.स. 1960 च्या कैरो बैठकीत या चळवळीच्या कर्णधारांनी ठरविलेल्या पाच सुत्रानूसार 25 राष्ट्रांना आमंत्रित करण्यात आले होते. पं. नेहरूंच्या पुढाकारातून अस्तीत्वात आलेला अलिप्ततावादी राष्ट्रांचा गट तात्कालीन दोन्ही महासत्तांच्या गटात वैचारिक व लष्करीदृष्ट्या सामील न होता. त्यांच्यात समन्वय निर्माण करण्यासाठी प्रयत्नरत होता. याबाबत आपली भूमिका स्पष्ट करतांना पं. नेहरू म्हणतात की, ''आम्हाला या देशाच्या किंवा त्या देशाच्या नेतृत्वाखाली तिसऱ्या गटाची स्थापना करायची नाही. तर आम्हांला दोन्ही महासत्तांना मिळून एक सहकार्यावर आधारीत विश्‍वाची निर्मिती करायची आहे.''[8]

या परिषदेत निःशस्त्रीकरण, आंतरराष्ट्रीय संबंध, शीतयुध्दाची वाढती तीव्रता, साम्राज्यवाद, वसाहतवाद, जागतिक शांतता, तटस्थता व सहअस्तीत्व, विविध देशांतील स्वातंन्त्र्य आंदोलने आदी आंतरराष्ट्रीय पातळीवरील समस्यांवर चर्चा करण्यात आली. या परिषदेत पं. नेहरूंनी अलिप्ततावादाची भूमिका स्पष्ट केली. अलिप्ततावाद हे तिसऱ्या जगातील राष्ट्रांसाठी हक्काचे व्यासपिठ बनले. या व्यासपिठाच्या निर्मितीत पं. नेहरूंची भूमिका महत्वपूर्ण राहिली आहे. अलिप्ततावादी राष्ट्रांच्या बेलग्रेड या पहिल्या परिषदेत संघटन, ऐतिहासिक निर्णय व त्याची यशस्वीता यात पं. नेहरूंचा सिंहाचा वाटा राहिला आहे.

VI) दुसऱ्या महायुध्दानंतर दोन महासंत्तातील शीतयुध्दामुळे आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील मागास, विकसनशील व नवस्वतंत्र राष्ट्रांसमोर स्वतंत्र अस्तीत्व टिकविण्याचे आव्हान होते. कारण ही राष्ट्रे नुकतीच स्वतंत्र झाली होती. काही स्वातंन्त्र्याच्या उंबरठ्यावर होती. सोबतच या राष्ट्रांना आर्थिक विकास व राष्ट्रीय हित जोपासण्याचे आव्हानही पेलावयाचे होते. यासाठी दोन्ही महासत्तांच्या सत्तासंघर्षापासून स्वतःला दूर ठेवणे अपेक्षित होते. अशा स्थितीत अलिप्ततावादाचा विचार समोर येणे स्वभाविक होते. या विचाराला मूर्त स्वरूप देण्याचे काम पं. नेहरू, कर्नल नाझेर व मार्शल टिटो यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. प्रारंभी पाश्‍चात्य राष्ट्रांकडून अलिप्ततावादाकडे साशंकतेच्या, नकारात्मकतेच्या दृष्टीने पाहिले जात असत. यासंबंधी बेलग्रेड परिषदेत पं. नेहरूंनी आपली भूमिका स्पष्ट करतांना म्हटले की, ''आम्ही या संम्मेलनाला अलिप्ततावादी देशाचे सम्मेलन म्हणतो.... अलिप्ततावादाला सकारात्मक अर्थ दिला तर युध्द प्रयोजनासाठी स्थापित लष्करी गट, करार आणि यासारख्या इतर गोष्टींचा विरोध करणारे राष्ट्र असा आशय त्यास प्राप्त होतो.''[9]

पं. नेहरूंना अलिप्ततावादाचे धोरण म्हणजे तटस्थता किंवा संपूर्ण अलिप्तता हा दृष्टीकोणही मान्य नव्हता. यावर भाष्य करतांना पं. नेहरू म्हणतात, ''जेथे स्वातंन्त्र्य संकटात आहे. न्यायाला आव्हान दिले आहे, किंवा आक्रमण झाले आहे, तेथे आम्ही तटस्थ राहणार नाही व राहू शकत नाही.''[10] अशा प्रकारे आपल्या विविध भाषणांतून पं. नेहरूंनी अलिप्ततावादाचा अर्थ स्पष्ट केला. त्यांना अलिप्ततावादाचा सक्रिय तथा सकारात्मक अर्थ अभिप्रेत होता. यानुसारच आंतरराष्ट्रीय पातळीवर त्यांनी अमेरिका, पाश्‍चात्य राष्ट्रे व सो. रशियाकडून साम्राज्यवादाला खतपाणी घालणाऱ्या कृत्याची कठोर शब्दांत निंदा केली होती.

VII) अलिप्ततावादाच्या सिंध्दातात निर्णय स्वातंन्त्र्याला प्राधान्य देण्यात आले होते. पं. नेहरूंना अलिप्ततावादाच्या माध्यमातून जागतिक शांततेची स्थापना करायची होती. तसेच आशिया, आफ्रिका व लॅटीन अमेरिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांच्या राष्ट्रीय हितानुसार नवस्वतंत्र परराष्ट्र धोरणाचे संचालन करायचे होते. यासंबंधी पं. नेहरूं म्हणतात,

''अलिप्ततावाद हा राष्ट्रीय स्वातंन्त्र्याचा सिध्दांत आहे. कोणत्याही एका गटात प्रवेश करण्याचा अर्थ म्हणजे आपल्या आवश्यकतेनुसार नाही तर दुसऱ्या राष्ट्राच्या स्वार्थाच्या पूर्ततेसाठीचे साधन होणे होय. आत्मनिर्णयाची पुर्ण शाश्वती तेव्हांच होऊ शकते की, जेंव्हा आपण दुसऱ्याच्या अनुसार नाही तर आपल्या आवश्यकतेनुसार कार्य केले पाहिजे.''[11] तिसऱ्या जगातील राष्ट्रांचा स्वतंत्र परराष्ट्र धोरण निर्धारणाची अभिलाषा होती. ही अभिलाषा पूर्ण करण्याचे साधन होते अलिप्ततावाद. कारण हे राष्ट्र कोणत्याही राष्ट्राचा तथा शक्ती गटाचा उपग्रह बनू ईच्छित नव्हते.

VIII) अलिप्ततावादाच्या कर्णधारांना अलिप्ततावादाच्या माध्यमातून आपआपल्या देशाचे राष्ट्रीय हित साध्य करायचे होते. म्हणजेच तिसऱ्या जगातील राष्ट्रांनी अलिप्ततावादाचा स्विकार करण्याचे कारण म्हणजे राष्ट्रीय हित होय. कारण या राष्ट्रांना राजकीय सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास साधायचा होता. पं. नेहरूंना याची जाणीव हाती की, भारताला आंतरराष्ट्रीय पटलावर स्वतःचे स्वतंत्र अस्तीत्व निर्माण करण्यासाठी आणि दोन्ही महासत्तांकडून आर्थिक व इतर सहाय्यता मिळविण्यासाठी अलिप्ततावादाचाच आधार घेणे आवश्यक होते. अशीच स्थिती कर्नल नासेर, मार्शर टिटो यांची होती. कर्नल नासेर यांना सुवेझ कालव्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जागतिक जनमत निर्माण करण्याबरोबर इस्लामिक राष्ट्रात इजिप्तची स्थिती सर्वोच्च बनवायची होती. तर मार्शल टिटो यांना साम्यवाद व भांडवलवादी साम्राज्यवादापासून मुक्तता मिळवायची होती. या तिन्ही प्रवर्तकांच्या भूमिकेमुळे अलिप्ततावादाचा विकास योग्यरितीने होवू शकला. याबाबत असे म्हणता येईल की, 'जगातील दोन्ही प्रमुख सत्तागट व त्यांना मान्य असलेल्या विचारप्रणाली यांचेशी बांधीलकी न ठेवता सर्व नवस्वतंत्र व विकासशील राष्ट्रांनी स्वतःचे धोरणात्मक स्वातंन्त्र्य कायम राखून जगातील तणाव कमी करण्यास, शांतता क्षेत्राचा विस्तार करण्यास, आणि स्वतःच्या राष्ट्रीय समस्यांवर अधिक लक्ष केंद्रीत करण्यास या तिन्ही प्रवर्तक राष्ट्रांनी इतरांना प्रवृत्त केले हे त्याचे या चळवळीला महान योगदान होय.'[12]

पं. नेहरूंच्या अलिप्ततावादी चळवळीच्या यशातील योगदानाचा विचार करता, त्यांनी भारतालाच नव्हे तर तिसऱ्या जगातील राष्ट्रांना शीतयुध्दाच्या गटा–गटाच्या राजकारणात आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून आर्थिक, तंत्रज्ञानात्मक आणि सामाजिक विकास साधण्याचा मुलमंत्र मिळवून दिला. पं. नेहरूंनी शीतयुध्दकालीन महासत्ताच्या दोन ध्रुवीय विश्वरचनेत तिसऱ्या जगाची अलिप्ततावादाच्या रूपात एक स्वतंत्र विश्वरचना निर्माण केली.

## 5) निष्कर्ष :–

पं. नेहरूंनी स्वातंन्त्र्यापूर्व काळापासून आशिया – आफ्रिका खंडातील राष्ट्रांच्या एकतेसाठी प्रयत्न केले. त्यासाठी ब्रुसेल्स व आशिया मैत्री परिषदेत या राष्ट्रांच्या एकतेची आवश्यकता यावर भर दिला. भारत स्वतंत्र झाल्यानंतर आशिया, आफ्रिका व लॅटीन अमेरिकेतील राष्ट्रांसमोर असलेल्या विविध समस्या सोडविण्यासाठी बाडुंग परिषद व बेलग्रेड घेण्यात आली. या सर्व परिषदा घेण्यासाठी पुढाकार तथा या परिषदाचे नेतृत्व पं. नेहरूंनी केले होते. या विविध परिषदातून तिसऱ्या जगाची तथा अलिप्ततावादाचा उदय झाला. यासाठी सिंध्दाताची (तात्वीक पाया) मांडणी करणे, त्याचा प्रचार व प्रसार करणे. आदिबाबत पं. नेहरूंची भूमिका महत्वपूर्ण राहीली. तिसऱ्या जगातील राष्ट्रांना अलिप्ततावदाच्या व्यासपिठावर एकत्र आणण्यात पं. नेहरूंची भूमिका ही संघटनकर्त्यांची राहिली आहे.

## संदर्भ ग्रंथ :–

1) शशी थरूर, मनोहर सोनवणे (अनुवाद) – शोध नेहरूंचा आणि भारताचाही, समकालीन प्रकाशन, पूणे 2015, पृष्ठ क्र. 173 व 174

2) माधव गोडबोले – जवाहरलाल नेहरूंचे नेतृत्व : एक सिंहावलोकन, राजहंस प्रकाशन, पूणे 2014, पृष्ठ क्र. 178 व 179

3) बी.आर. जोशी (संपादक) – डायमंड सामाजिक ज्ञानकोश, खंड 03, डायमंड पब्लिकेशन्स, पूणे 2007, पृष्ठ 2208

4) शैलेंन्द्र देवळाणकर – समकालीन जागतिक राजकारणः भारताच्या परराष्ट्र आणि संरक्षण धोरणापुढील आव्हाने, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद 2014, पृष्ठ क्र. 07

5) रामचंद्र गुहा, शारदा साठे (अनुवाद) – गांधीनंतरचा भारत, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, ठाणे 2011, पृष्ठ क्र. 179

6) राजेशकूमार चौहान – भारतीय विदेशनिती में गुटनिरपेक्षता, राजपब्लिशिंग हाऊस जयपूर, पृष्ठ क्र. 05

7) सरोज बाला – आंतरराष्ट्रीय राजनिती, ओमेगा पब्लिकेशन्स, नई दिल्ली 2010, पृष्ठ क्र. 135

8) बी.के. उपाध्याय – भारतीय राजनय तथा विदेशनिती, विश्व भारती प्रकाशन, आगरा, पृष्ठ क्र. 144

9) बी. एल. फडीया – अन्तराष्ट्रीय राजनीती : सिध्दांत एवं समकालीन राजतीतिक मुद्दे, साहित्य भवन पब्लिकेशन्स, आगरा 2010 पृष्ठ क्र. 310

10) चंद्रशेखर दिवाण – भारताची विदेशनिती, विद्या प्रकाशन, नागपूर 1992, पृष्ठ क्र. 73

11) जवाहरलाल नेहरू, हरिभाऊ उपाध्याय (संपा) – मेरी कहानी, सस्ता साहित्य मण्डल, नई दिल्ली 1965, पृष्ठ क्र. 538

12) कित्ता क्र. 10, पृष्ठ क्र. 79